**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ९१/२०१५ मधील निशाणी ६४ वर आदेश-</u>**

CNR : MHSN05-000379-2015

प्रतिवादी क्र. १ ते ३, ५ ते ९ यांनी सदर अर्ज उलटतपास नाही हा आदेश रद्द होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींचे कथनानुसार, त्यांनी निशाणी ६० ला कैफियत दाखल केलेली आहे व कुळ हक्काबाबत कथने केलेली आहेत. मात्र त्याबाबत निशाणी ६२ ला मुद्दा काढण्यात आलेला नाही. प्रतिवादींचे पूर्वहक्कदार नामदेव हे सर्व प्रकरणे पहात होते. मात्र दरम्यान त्यांचे निधनानंतर प्रकरणांची जबाबदारी निश्चित झाली नाही व प्रतिवादींदरम्यान एकमेळ राहिला नाही. त्यामुळे प्रतिवादी या प्रकरणी बराच काळ गैरहजर राहिले. दरम्यान वादीने निशाणी ३४, ४७, ४८, ४९ ला स्वतःचे तसेच साक्षीदारांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादी गैरहजर राहिल्याने निशाणी ३४, ४८ व ४९ वर उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांना उलटतपास घेण्याची एक संधी मिळणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीतर्फे सदर अर्जास म्हणणे देवून तीव्र विरोध दर्शविण्यात आलेला आहे व प्रतिवादी हे वारंवार जाणुनबुजुन गैरहजर रहात होते असे नमुद केले आहे. सदरचा दावा अंतिम सुनावणीस आल्यानंतर प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी जाणीवपुर्वक विलंब करीत आहेत. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही विधिज्ञांचा सविस्तर युक्तीवाद मी ऐकला आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३, ५ ते ९ हे या कामी बजावणी झाल्यानंतर गैरहजर राहिल्याने दि. १०.०८.२०१५ रोजी त्यांचेविरुद्ध एकतर्फा आदेश करण्यात आलेला होता. दरम्यान या प्रतिवादींनी निशाणी ५६ चा अर्ज दि. ३०.०१.२०१८ रोजी देवून त्यांचेविरुद्ध झालेला आदेश रद्द होवून मिळण्याची विनंती केली. सदर अर्ज दि. १५.०६.२०१८ रोजी खर्च र.रु. २,५००/- वर मंजुर झालेला आहे.

यानंतर प्रतिवादी यांची कैफियत व पुरसीस प्रकरणी समाविष्ट झालेली असून दि. १९.०६.२०१९ रोजी निशाणी ६२ नुसार मुद्दे स्थापित झालेले आहेत.

५. दरम्यान मा. जिल्हा न्यायालय सांगली यांचे आदेशानुसार सदर प्रकरण या न्यायालयाकडे वर्ग झालेले आहे. वादीतर्फे वादी क्र. १अ याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी ३४ ला दाखल होते. यानंतर वादीने निशाणी ४७, ४८ व ४९ नुसार साक्षीदारांची प्रतिज्ञापत्र दाखल केलेली आहेत. प्रतिवादी व तर्फे विधिज्ञ पुकारता गैरहजर राहिल्याने त्यांचेविरुद्ध निशाणी ३४, ४८, ४९ वर दि. २८.०२.२०२० व १३.०३.२०२० रोजी उलटतपास नाही असे आदेश करण्यात आलेले आहेत. यानंतर कोरोना या साथीच्या रोगामुळे उत्पन्न झालेली परिस्थिती पहाता दि. २४.०३.२०२० नंतर न्यायालयीन कामकाजावर बंधने आलेली होती. मात्र दि. ०८.०६.२०२० पासून न्यायालयांचे कामकाज अंशतः सुरु करण्यात आले व दि. ०१.१२.२०२० पासून कामकाजाच्या आवाक्यामध्ये वाढ करण्यात आली. यानंतर दि. ०५.१२.२०२० रोजी प्रतिवादींनी प्रस्तुतचे अर्ज दाखल केलेले आहेत.

६. वास्तविक पहाता प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ ते ९ हे यापूर्वी देखील या प्रकरणामध्ये विलंब होण्यास कारणीभूत आहेत. वेळोवेळी प्रकरणी हजर न राहणे व योग्य ती कार्यवाही न करणे यामुळेच प्रस्तुतचे प्रकरणे पाच वर्षाहून अधिक काळ प्रलंबीत आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार, नामदेव हे मयत झाल्यामुळे एकमेळ राहिला नाही. वास्तविक पहाता नामदेव हे या कामी पक्षकार नाहीत व ते केव्हा मयत झाले याचा तपशिल नमुद नाही. यामुळे सदर कारण प्रतिवादींकरीता फारसे उपयुक्त ठरत नाही. तरी परंतु, आदेश झाल्यानंतर कोरोना परिस्थिती उद्भवल्यामुळे काही कालावधीकरीता नक्कीच प्रतिवादी यांना न्यायालयामध्ये हजर राहणे अडचणीचे ठरले होते. मात्र दि. ०८.०६.२०२० पासून प्रतिवादी यांना या कामी काही प्रगती करणे अपेक्षित होते. मात्र तसे घडलेले नाही.

७. प्रस्तुत दावा हा गहाणमुक्त होवून मिळण्याकरीता दाखल केलेला दिसून येतो. दाव्याद्वारे वादी व प्रतिवादी यांचे महत्वाचे हक्क निष्पन्न होणार आहेत. याकरीता प्रतिवादी यांना आणखी एक संधी देणे योग्य ठरेल. तसेच प्रतिवादी यांना संधी दिल्यास दावा गुणदोषावर निर्णित करणेस मदत होणार आहे. मात्र सदर उलटतपास नाही हा आदेश रद्द करताना प्रतिवादी यांचेवर काही खर्च बसविणे मला आवश्यक वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ ते ९ यांनी एकत्रात पुढील तारखेपर्यंत वादींना खर्च र.रु. ३००/- देणेचा आदेश करण्यात येतो.

३. खर्च रक्कम दिल्यानंतर निशाणी ३४, ४८ व ४९ वर झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करण्यात येतो.

४. प्रकरण जुने असल्यामुळे यापुढे वादी व प्रतिवादी यांनी विनाविलंब पुढील कार्यवाही करणेची आहे.

Abhijit Rajshekhar Solapure

Digitally signed by Abhijit Rajshekhar Solapure
Date: 2021.01.28 15:55:38 +0530

इस्लामपूर (अभिजीत रा. सोलापुरे)

दिनांक–२५.०१.२०२१ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर